# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 21.01.2025** **वार-मंगळवार**

---

**पिंपरी चिंचवड 50**

पिंपरी चिंचवड महापालिका स्थापनेला 2032 रोजी 50 वर्षे पुर्ण होत आहेत. त्यानिमित्ताने महापालिकेने व्हिजन@50 शहर धोरण हा उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमाअंतर्गत विविध विषय आणि भविष्यात येणाऱ्या समस्यांवर महापालिकेच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांची मते, सल्ले, उपाययोजना जाणून घेण्यासाठी गटचर्चेचे आयोजन करण्यात आले होते. येत्या 7 वर्षात महापालिका सेवांमध्ये सुधारणा करण्यावर भर देण्यात येणार आहे. शहरी गतिशीलता, पर्यावरण आणि राहणीमान, शिक्षण आणि कल्याण, तंत्रज्ञान आणि प्रशासन, शहरी पायाभूत सुविधा, आर्थिक विकास या प्रमुख विषयांवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे.

**साहित्य संमेलन दिल्ली**

फेब्रुवारी महिन्यात दिल्ली इथं होणाऱ्या 98 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी पुण्याहून विशेष रेल्वे गाडी सोडण्यात येणार आहे. दीड हजार रुपये भरून साहित्य रसिकांना या गाडीने दिल्लीला जाता येणार असल्याचं हिंदुस्थान समाचार या वृत्तसंस्थेनं आपल्या बातमीत म्हटलं आहे.

**विकास**

पुणे महापालिकेच्या विकास आराखड्यामध्ये दर्शविण्यात आलेल्या सरकारी अत्यावश्यक सेवांच्या जागा संबधित खात्यांनाच भाडेतत्वावर देण्याऐवजी मोबदला घेऊन त्याच खात्यांना मालकीहक्काने देण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याचा पुणे महापालिका स्तरावर विचार सुरू आहे. या निर्णयाची अंमलबजावणी झाल्यास शहरातील पोलिस, टपाल कार्यालये, महावितरण सारख्या सेवांसाठी दिलेल्या जागा या संबधित खात्यांच्या मालकीच्या होणार असून महापालिकेचे दायित्व कमी होणार आहे.

**पुणे बांगलादेश**

पुणे शहर परिसरात प्रत्येक पोलीस ठाण्यांतर्गत वास्तव्य करणा-या परप्रांतीय मजुरांची माहिती संकलित करून बेकायदा वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी घुसखोरांवर कारवाई करण्याचे आदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिले आहेत. पुणे स्टेशन आणि महर्षि परिसरातून दोन जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. महर्षीनगर भागात वास्तव्यास असलेल्या बांगलादेशी नागरिकाकडून परदेशी चलनही जप्त करण्यात आले होते. बांगलादेशी घुसखोरांना बनावट कागदपत्रे तयार करून देणाऱ्या दलालांचा शोध घेण्याचे आदेश देण्यात आले असल्याचं हिंदुस्थान समाचार या वृत्तसंस्थेनं आपल्या बातमीत म्हटलं आहे.

**गुलवेल बॅलन्स सिंड्रोम**

पुण्यात गुईलेंन बॅरे सिंड्रोमचे 22 संशयित रुग्ण आढळून आले आहेत. ज्या भागात हे रुग्ण आढळले आहेत, त्या भागात पथक दाखल होणार आहे. गुईलेंन बॅरे सिंड्रोम हा एक मज्जासंस्थेसंबंधीचा विकार आहे. हा आजार दुर्मिळ असला तरीही

धोकादायक नसल्याची माहिती पुणे आरोग्य विभागाकडून देण्यात आली आहे. पुणे शहरातील 6 आणि इतर 16 रुग्ण हे पुणे जिल्ह्यातील आहेत. हा आजार संसर्गजन्य नसल्याचं महापालिका आरोग्य प्रमुख नीना बोराडे यांनी म्हटलं आहे. दरम्यान सिंहगड रस्ता परिसरातील पाण्याची तपासणी करून हा आजार दूषित पाण्यामुळे झाला आहे किंवा नाही तपासले जाईल असं महापालिकेचे आयुक्त डॉक्टर राजेंद्र भोसले यांनी म्हटलं आहे.

रुग्णांकडून जुलाब, ताप आणि अशक्तपणासारख्या तक्रारी केल्या जात आहेत. या रुग्णांना गुईलेन बॅरे सिंड्रोमची लागण झाल्याचं दिसून आल्याची माहिती खासगी रुग्णालयाच्या डॉक्टरांनी दिली आहे. याबाबत आयोजित पत्रकार परिषदेत ते आज पत्रकारांशी बोलत होते. उपचारासाठी रुग्णालयात दाखल झालेले रुग्ण धायरी, सिंहगड रोड आणि किरकटवाडी परिसरातले आहेत. यातील 16 पैकी 8 रुग्णांना व्हेंटिलेटर अर्थात जीवरक्षक प्रणालीवर ठेवण्यात आलं आहे.

**बाल महोत्सव**

पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील मळवली भाजे नुकताच इथं चाचा नेहरु बाल महोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. जिल्ह्यातील महिला आणि बालविकास विभागांतर्गत येणाऱ्या बालगृहांमधील 1000 हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. मुलांमध्ये प्रचंड क्षमता आहे; योग्य संधी दिल्यास ते देशाचा उज्ज्वल भविष्य घडवू शकतात असं मत महिला आणि बालविकास विभागाचे सह आयुक्त राहुल मोरे यांनी उद्घाटनप्रसंगी व्यक्त केले.

**पाणीबाणी**

येत्या गुरुवारी म्हणजे 23 जानेवारी रोजी पुणे शहरातील तळजाई टाकी येथील मुख्य व्हॉल्व्हचे आणि मुख्य जलवाहिनीचे तातडीचे तसेच अत्यावश्यक स्वरूपाचे दुरुस्तीचे काम घेण्यात येणार आहे. या दिवशी भारती विद्यापीठ परिसर, आंबेगाव पठार, चंद्रभागा, निलगिरी चौक, जिजामाता भुयारी मार्ग परिसर, आंबेगाव बुद्रुक, धनकवडी, सऱ्व्हे क्रमांक 3,4,7,8 तळजाई पठार, मेघदूत सोसायटी, आनंद भवन सोसायटी परीसरामधील पाणीपुरवठा बंद राहणार आहे तर 24 जानेवारी रोजी उशिरा आणि कमी दाबाने पाणीपुरवठा होणार आहे.

**निधन**

संत साहित्याचे अभ्यासक आणि वारकरी संप्रदायातील ज्येष्ठ कीर्तनकार डॉ. किसन महाराज साखरे यांयांच्यावर आज आळंदी इथं अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचं काल रात्री एका खासगी रुग्णालयात निधन झालं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी किसन साखरे महाराज यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज हवामान कोरडं होतं. कमाल तापमान 32 तर किमान तापमान 12 पूर्णांक 7 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं.उद्या आकाश निरभ्र तर संधीकळी अंशतः ढगाळ राहील राहील असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**